जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१२/११/२०२४

## दि.११/११/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर (खराडी) पो स्टे ५९८/२०२४,भा.न्या.सं.कलम १०९,११५(२),३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २२ वर्षे,रा. बोराटेनगर,लेबर कॅम्प,खराडी पुणे |
| **आरोपीत** | १)प्रमोद परमेश्वर भुईयां वय २९ वर्षे,रा.बोराटेनगर,लेबर कॅम्प,खराडी पुणे २)मुकेशकुमार राजेश्वर मेहता वय २६ रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/११/२०२४ रोजी रात्री १०/३० वा.चे सुमा.बोराटेनगर,लेबर कॅम्प,खराडी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे जेवण करुन नमुद ठिकाणी त्यांचे रुममध्ये मोबाईल पाहत असताना नमुद इसम व त्यांचे साथीदार हे त्या ठिकाणी दारु पित असताना फिर्यादी यांचा एक साथीदार बोधु शेख हा नमुद इसमांना म्हणाला की, तुम तुम्हारे बीवी और बच्चो को अच्छा खाना नही खिला पिला सकता तो शादी क्यु बनाया असे म्हणाला असता त्याचा राग नमुद इसमांना आल्याने त्यांनी इसम नामे बोधु शेख वय ३७ वर्षे रा.सदर याला मारहाण करून त्यास जिवे मारण्याचे उद्देशाने पायातील चामडयाचे बुटाने लाथा मारुन डोक्यास गंभीर दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.सिध्दनाथ खांडेकर मो.नं.९५२९७९६००६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १७४१/२०२४,भा.न्या.सं.कलम ३३१(३),३३१(४),३०५(अ) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६२ वर्षे रा.गोपाळपटटी मांजरी बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/११/२०२४ रोजी रात्री २२/०० ते दि.०९/११/२०२४ रोजी रात्री २१/०० वा.चे सुमा. धारवाडकर कॉलनी, गोपाळपटटी हडपसर मांजरी रोड, मांजरी बुद्रुक पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे गांवी गेले असता यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन, त्यावाटे आंत प्रवेश करून,घरातील ०४,८७,८६३/-रू.कि.चा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.महेश कवळे मो.नं.९६८९९५६९९९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे १२५३/२०२४,भा.न्या.सं.कलम,३१९(२),३१८(४),३१६(५),३(५),माहिती व तंत्रज्ञान का.६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३७ वर्षे रा.भाग्योदयनगर कोंढवा,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/७/२०२४ ते दि.०९/०८/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक यांनी स्टॉक ट्रेडींग खरेदी करण्याचे सांगुन त्यातून भरपूर नफा मिळवून देतो असे आमिष दाखवून त्यांचे बँक खातेवर २५,९९,०००/- रू.भरण्यास भाग पाडून कोणतीही रक्कम परत न करता फिर्यादीची अर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे)श्री. सुरज बेंद्रे मो.नं ९९२२९९८२३२ |

## प्रेस नोट दि.१२/११/२०२४

## दि.१२/११/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खराडी पो स्टे ५९९/२०२४,भा.न्या.सं.कलम १०९,३५२,३२४(४)(५),१८९(२),१९१(२),१९०,आर्म ॲक्ट ४(२५) सह म.पो.का कलम ३७(१)(३) सह १३५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४१ वर्षे रा.वडगाव शेरी,पुणे |
| **आरोपीत** | १)मिलींद गोरख पवार वय २४वर्षे रा.खांदवेनगर वाघोली,पुणे २)मच्छिंद्र किसन पवार वय ४३ वर्षे रा.सदर(अटक) त्यांचे इतर साथीदार(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/११/२०२४ रोजी स.१०/०० ते ११/०० दरम्यान कोहिनूर हॉटेल शेजारी, आपले घर, खराडी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम हे नमुद ठिकाणी शेजारी-शेजारी राहत असून नमुद इसम याचे घराचे बांधकाम सुरू असल्याने त्यांनी फिर्यादी यांचे जागेमध्ये बांधकामाचे मटेरियल ठेवले होते. त्यामुळे फिर्यादी यांचे इमारतीतील भाडेकरूचा येण्या-जाण्याचा रस्ता बंद झाल्याने ते मटेरियल काढण्याबाबत फिर्यादी यांनी नमुद इसम यांना सांगीतले होते. त्याचा राग मनात धरुन फिर्यादी व त्यांचा भाऊ हे नमुद ठिकाणी उभे असताना नमुद इसम यांनी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व त्यांचे भावास शिवीगाळ व धमक्या देऊन त्याचे हातातील लोंखडी हत्याराने फिर्यादी यांचे डोक्यात वार करून त्यांचा जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करून सदर ठिकाणी दहशत निर्माण करून फिर्यादीच्या बिल्डींगची काच फोडुन नुकसान केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.राहुल कोळपे मो.नं.९०८२७३७४७५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**